पृ-६७

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

## हिंदु खाटिक (अनुसूचित जाती यादी क्र. -३१) जातीचा

## अहवाल

वर्ष :- २०१४-२०१५

# खाटिक जातीचा अहवाल

**प्रस्तावना** :- राज्यातील खाटिक जातीच्या समाजाच्या संघटनेने शासनाकडे खाटिक समाजाच्या लोकांना त्यांच्या नावासमोर धनगर खाटिक, क्षत्रिय धनगर खाटिक, मराठा, सुर्यवंश लाड, कलाल इ. शब्दांचा उल्लेख आल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र तसेच जात प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस अनेक अडचणीचा सामना करावा लागतो किंबहुना त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाहीत, अशा स्वरुपाचे निवेदन शासनास सादर केलेले होते. या अनुशंगाने लक्षवेधी सूचना देखील सादर करण्यात आलेली होती. या संदर्भात खाटिक समाजाच्या संघटनेने आंदोलने व मोर्चे देखील काढलेले आहेत. शासनाने या संदर्भात बार्टी या संस्थेला, खाटिक या समाजाबाबत अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

केंद्रशासनाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा १९७६ (१९७६ चा १०८ वा) दिनांक २७ जुलै १९७७ कायदयानुसार जातीच्या याद्यांच्या संदर्भात क्षेत्रिय बंधनाची अट रद्द करण्यात आली. त्यामुळे राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक सी. बी. सी. १४७५/२७२-का.५, दिनांक ९ डिसेंबर १९७७ नुसार इतर मागास वर्गीयांच्या यादीतील अ. क्रमांक ७७ वर असलेल्या खाटिक ही जात वगळण्यात आली.

महाराष्ट्रात हिंदु खाटिक लोकांचे वास्तव्य बहुतांश जिल्हयात आहेत. या समाजाचा प्रमुख व्यवसाय शेळी, मेंढया, बकरी यांची कत्तल करुन त्यांचे मांस विक्री करणे हा आहे. शेळी, मेंढया व बकऱ्यांचे पालन करणे व त्याची विक्री करणे हा व्यवसाय धनगर समाजाशी संबंधित आहे. खाटिक समाजाचे लोक मेंढया बकऱ्या इत्यादिची खरेदी धनगर समाजाच्या लोकांकडून करतात. बऱ्याचदा खाटिक समाजाचे लोक व्यवसायाकरीता खरेदी केलेल्या मेंढया बकऱ्या इत्यादिची खरेदी ग्रामीण भागात असलेल्या क्षेत्रातून करतात व या जनावरांची वहातूक मोठया शहरांमध्ये आणण्यासाठी धनगर समाजाची मदत घेतात, त्यामुळे बऱ्याच ठिकाणी खाटिक समाजाच्या लोकांच्या नावांमध्ये अथवा जातींच्या नावामध्ये क्षत्रिय मराठा धनगर, सुर्यवंशी लाड, कलाल इ. नावांचा उल्लेख त्यांच्या नावासोबत होत असल्यामुळे खाटिक जातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र मिळविताना अनेक प्रकारच्या अडचणी येतात, अशी या समाजाची तक्रार आहे व त्यासाठी मार्ग काढणेची मागणी आहे. हिंदु खाटिक आणि हिंदु धनगर या दोन्ही समाजाचे संबंध हे पुर्वापार आहेत.

खाटिक जातीच्या समाजाचा पूर्व इतिहास व त्यांच्या चालीरिती, रुढी परंपरा या बाबतचा अभ्यास या संस्थेमार्फत करण्यात आला. याकरीता सोबत जोडलेल्या संदर्भसूची नुसार एकूण २० प्रकारचे विविध संदर्भांचा

पुस्तकांच्या माध्यमातून विविध माहिती उपलब्ध करण्यात आली तसेच हिंदू खाटिक समाजातील लोकांकरीता १ दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली व या कार्यशाळेमध्ये राज्यातील सर्व जिल्हयातील खाटिक जातीच्या लोकांचा सहभाग होता, या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

## खाटिक जातीचा अहवाल

**टिप :1) अ - संदर्भ साहित्यातुन मिळालेली माहीती**

**2) ब - १ दिवसाच्या कार्यशाळेच्या माध्यमातून प्राप्त माहिती**

| अ.क्र. | मुद्दे | हिंदु खाटिक - अनुसूचित जाती / S. C.- ३१ |
|---|---|---|
| १ | **उगम** | **(अ) खाटिक** हा शब्द 'खाट' या हिंदी शब्दापासून तयार झालेला आहे. 'खाट' या शब्दाचा अर्थ - त्वरीत हत्या, हत्या करणे असा आहे. पूर्वीच्या काळी खाटिक लोक हे राजस्थानमधील राजाला मांसाच्या पुरवठा करीत असत.<br>खाटिक या शब्द उत्पत्तीचे अनेक ऐतिहासिक दाखले आहेत. अशाच ऐतिहासिक पुराव्यानुसार "खाटिक" हा शब्द 'खाटीका' या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे .<br>**खाटीका** - शिकार करणे, कत्तल करणे, खाटिकांच्या बाबतीत इतिहास असे सांगतो की, हिंदु खाटिक हे मुळचे क्षत्रिय होते. ते शिकारीचे काम करीत असत. यावरुन छोट्या प्राण्यांची कत्तल हा त्यांचा व्यवसाय बनला. पुराणानुसार सहाव्या शतकात कर्मकांडाला विशेष महत्व होते. बाराव्या शतकात खाटिक क्षत्रीयांपासून वेगळे होऊन खाटिक ही स्वतंत्र जात हिंदू धर्मात अस्तित्वात आली. हिंदू धर्मातील खाटिक लोकांचा समूह हा मोठ्या प्रमाणात उत्तर भारतात दिसून येतो. हिंदू धर्माअंतर्गत खाटिक लोक हे छोट्या प्राण्यांची कत्तल करीत असे.<br>मुस्लीम धर्मात खाटिक ही जात पूर्वी अस्तित्वात नव्हती. परंतु ज्या मुस्लिम लोकांचा व्यवसाय प्राण्यांची कत्तल करणे, कातडी सोलणे आहे, त्यांचा समावेश कसाब, कसाई, कुरेशी या मुस्लीम धर्माच्या जातीत होतो. मुस्लीम खाटिक ही जात कशी अस्तित्वात आली याचा वेगळा इतिहास |

प्र-२३

| | | |
|---|---|---|
| | | आहे. इतर मागास वर्गीयांच्या यादीत राज्य शासनाने त्यांचा समावेश अनु. क्रमांक २५७ वर कसाई, कसाब, कुरेशी व अनु. क्रमांक ३१६ वर मुस्लिम खाटिक, कुरेशी खाटिक, कसाई असा केलेला आहे. <br>**(ब)** पूर्वी हिंदु खाटिक हा समाज कत्तलीचा व्यवसाय करीत, कत्तल करताना खट खट –खट असा आवाज होतो. या खट पासुन "खाटिक" हा शब्द अस्तित्वात आला. कत्तल करणे हे घाण काम असल्याने हा समाज मागास वर्गीय म्हणून गणला जाऊ लागला. या समाजाच्या वस्तीला खाटिक गल्ली असे म्हटले जाते व ही वस्ती गावागावात अस्पृश्य वस्ती शेजारीच असते. |
| २ | **भौगोलिक स्थान** | (अ) महाराष्ट्रात हिंदू खाटिक समुदाय आहे. तसेच मुस्लिम खाटिक देखील आहेत. महाराष्ट्रात जवळपास सर्व जिल्ह्यात खाटिक जातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. |
| ३ | **मुळ निवासाचे जिल्ह्ये व त्याभागात संबोधले जाणारे नाव** | विदर्भ – हिंदु खाटीक; प. महाराष्ट्र / कोकण- धनगर खाटीक; कोल्हापुर- मराठा खाटकी; सोलापुर व कोकण पट्टयात क्षत्रीय मराठा खाटीक, धनगर खाटीक; सोलापुर, उस्मानाबाद व इतर काही जिल्हयात– सुर्यवंशी लाड खाटिक, सुर्यलाड खाटिक; मराठवाडा – कलाल खाटिक, इत्यादि जातीच्या नावांचा उल्लेख दिसून येतो. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **धर्म/जात** | (अ)धर्म हिंदु आहे. <br>(ब) या समाजात उपजाती नाही. खाटिक हीच प्रमुख जात आहे. <br>(क) कलाल यांचा मुळ जुना व्यवसाय दारु गाळणे, दारुची विक्री करणे आहे व या जातीचा समावेश इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये अनु. क्रमांक २५४ दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे कलाल, लाड आणि खाटिक या भिन्न व्यवसाय करणाऱ्या भिन्न जाती आहेत. <br>(ड) खाटिक व धनगर या भिन्न व्यवसाय करणारे दोन स्वतंत्र जाती आहेत व शासनाने धनगर या समाजाला भटक्या जमातीच्या प्रवर्गात अनु. क्रमांक २९ वर समाविष्ट केलेले आहे. धनगर समाजाचे लोक व्यवसायाकरीता |

| | | |
|---|---|---|
| | | एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत असतात व ते मुळ गावापासून बऱ्याच लांब अंतरावर त्यांची वसाहत असते. त्यांची वेशभुषा व राहणीमान व चालीरिती या खाटिक जातीच्या लोकांपेक्षा भिन्न आहेत व त्यांना अस्पृश्य म्हणून संबोधण्यात येत नाही.<br>(इ) पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील हिंदु खाटिक समाजात फरक नाही. या दोन्हीही भागातील आडनावे, दैवते, चालीरीती या सारख्या आहेत. आडनावे:- टोणपे, साबणे, गगणे, सदानंदे, खडके, कांबळे, तपासे, डोंगरे, पलंगतोडे (पलंगे), गंगणे यांच्या विवाह पध्दती, सण-उत्सव, चाली रीती, परंपरा, दैवत सारखेच आहेत. यात कोणत्याही प्रकारचा भेद दिसून येत नाही व हे हिंदु खाटिक असुन त्यांच्यात पिढयानपिढया रोटी-बेटी व्यवहार होतात. |
| ५ | संस्कृती | (अ) **पितृसत्ताक पद्धत्ती**:<br>या समाजात पितृसत्ताक पद्धती आहे. मुलींना मुलांप्रमाणे संपत्तीत समान वाटा मिळतो.<br>**प्रथा / परंपरा**:<br>प्रथा, परंपरा या मराठी समुदायाप्रमाणे असतात.<br>**वराडे**:- विवाह, जन्मसोहळ्यामध्ये महिला गाणी तसेच नृत्य करतात.<br>**सण/ उत्सव**:<br>सर्व हिंदू सण/ उत्सव साजरे करतात. उदा; अक्षय तृतीया, पोळा, दिवाळी, दसरा, नाग पंचमी, रक्षाबंधन, गणपती इ . या समाजात ब्राह्मणाला एवढे महत्व नाही. त्याची भूमिका मर्यादित आहे. सत्यनारायण पूजा, विवाह, गृह प्रवेश, जन्मविधी, इ. साठी ब्राह्मणांला आमंत्रित केले जाते. यात्रा साजऱ्या केल्या जातात. या समाजाची महाराष्ट्रात मु. पो. पसरणी, ता. वाई, जि. सातारा, येथे नाथ जोगाई देवीची यात्रा तसेच दावडी लिंबगाव येथे दरवर्षी चैत्र महिन्यात खंडोबाची यात्रा भरते .<br>या यात्रांचे वैशिष्ट्य म्हणजे या यात्रांना हिंदू खाटिक समाजातील लोक हे संपूर्ण महाराष्ट्रातून एकत्र जमतात. खाटिक समाजावर तेली, आणि कोष्टी समाजातील संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो . |

| | | |
|---|---|---|
| | | (ब) हे लोक मराठ्यांप्रमाणे सर्व सण उत्सव साजरे करतात. यांच्या चालीरीती, परंपरा, या बहुतांशी मराठ्यांप्रमाणे असतात. या समाजात पितृसत्ताक पध्दती असते. मुलीना त्यांच्या मागणीप्रमाणे संपत्तीत वाटा मिळत असे. |
| ६ | **भाषा** | (अ) हिंदी, मराठी, इंग्लिश.<br>(ब) हे लोक घरात मराठी भाषा बोलतात. त्यांना हिंदी, इंग्रजी भाषेचे ज्ञान असते. काही लोक "खाटकी" ही व्यवहारिक बोली भाषेचा उल्लेख करतात. |
| ७ | **कुळ** | (अ) **कुळ**:- ढोके, घोलपे, कटारे, लारोकर, मदने, पारधी, रुमणे<br>**लारोकर कुळ**:<br>नागदेवतेची पूजा करतात. नागपंचमीच्या दिवशी सर्वजण एकत्र जमून नागदेवतेच्या चांदीच्या मूर्तीची पूजा करतात. काला पदार्थ बनवितात व हा पदार्थ प्रसाद म्हणून सर्वांना दिला जातो .<br>**घोलपे कुळ**:<br>**देव/देवता**:- खंडोबाची पूजा करतात. मुलाच्या विवाहाच्या वेळी जागरण करतात. जेजुरी हे पवित्र ठिकाण मानतात.<br>**मदने कुळ**:<br>**देव/ देवता / पवित्र स्थळ**<br>आखाडीची पूजा, विष्णू पूजा, विठोबा पंढरपुर, गजानन महाराज–शेगाव, साईबाबा –शिर्डी<br>(ब) या जातीत गोत्र ही संकल्पना नाही.<br>या जातीत कुळ संकल्पना नाही. आडनावालाच कुळ समजले जाते. समान आडनाव असलेल्या लोकांमध्ये विवाह होत नाही ते सगोत्र समजले जातात. |
| ८ | **जन्म विधी** | (अ) बाळ जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवी पुजली जाते. यालाच सटवाई पूजा असे म्हणतात. या दिवशी ब्रह्म मुलाचे भविष्य लिहितो अशी समज आहे. त्यानंतर बाराव्या दिवशी बारावी पुजली जाते. व नामविधीचा कार्यक्रम केला जातो यालाच बारसे असे म्हणतात. या दिवशी सर्व नातेवाईक मंडळीना बोलावले जाते. मुलाची आत्या हि बाळाचे नाव ठेवते. ब्राह्मणाने सुचविलेले नाव मुलाला देण्यात येते. गहू किंवा ज्वारीच्या घुगऱ्या वाटल्या जातात. |

| | | |
|---|---|---|
| | | झोपाळा सजवून त्यात बाळाला ठेवले जाते. बाळाच्या नावावर स्त्रिया गाणी म्हणतात. बाळाला भेट वस्तू दिल्या जातात .<br>बाळंतीण बाईला सव्वा महिना बाजूला ठेवले जाते. बारा दिवस माहेरी व सासरी दोन्ही ठिकाणी देवाची पूजा–अर्चा केली जात नाही. सव्वा महिन्यानंतर बाईला कुटुंबात घेतले जाते व तिचे दैनंदिन जीवन सुरु होते.<br>(ब) जन्म विधी हा हिंदु पध्दतीप्रमाणे करतात. बाळाच्या जन्माच्या ५ व्या दिवशी पाचवी पुजतात, १२ व्या दिवशी बारसे करतात. |
| ९ | **विवाह विधी** | (अ) विवाह हे नात्यातल्या –नात्यात केले जातात. उदा; आत्याची मुलगी मामाची मुलगी नात्याव्यातिरिक्त विवाह जुळविताना धागा – दोरा जुळतो की नाही हे पहिले जाते. एक आडनाव असलेल्या बरोबर विवाह होत नाही. पूर्वी मुलीचे विवाहाचे वय १२-१५वर्षे होते तर मुलाचे १६-२०वर्षे होते. विवाहाच्या वेळी मुला–मुलीची जन्म पत्रिका बघितली जाते पत्रिका जुळल्यानंतर विवाहासाठी मान्यता मिळते. कमीत कमी १८ गुण जुळणे आवश्यक असते. मुलीकडचे लोक विवाह जुळविण्यासाठी आमंत्रण देतात.<br>या समाजात बहुतांशी हुंडा पद्धत नाही परंतु विवाहात वधु पक्षाकडून वधूला दागिने कपडे, भांडी, इ. भेटवस्तु दिल्या जातात.<br>**विधी :**<br>सर्व प्रथम विवाह पक्का करण्यासाठी सुपारी फोडण्याचा कार्यक्रम असतो. त्यानंतर साखरपुडा असतो .<br>**लग्नविधी :-**<br>लग्न कार्यामध्ये वधु–वराचे घरी मुहूर्तमेढ लाकडाची रोवली जाते त्यावर आंब्याची डहाळी, गवताची पेंढी, लामण दिवा असतो. १०-१५दिवस अगोदर नवरा, नवरी यांच्या दोन्ही घरी देव कार्य असते. मुलाच्या लग्नात देव उजळवीले जातात. देव उजळवीने म्हणजे घरातील चांदीचे देव सोनारकडून पोलिश केले जातात. सोनाराच्या दुकानापासून वाजंत्री लावून वाजत-गाजत देव घरी आणले जातात. देव्हाऱ्यात त्यांची स्थापना केली जाते. या दिवशी सुवासिनी, नातेवाईक, गावातील सर्व मंडळी यांना जेवणासाठी आमंत्रण दिले |

जाते. देवाला पुरण पोळीचा नेवैद्य दिला जातो जेवण मात्र मटणाचे असते .

लग्ना अगोदर कंदुरी (न्याज) हा विधी केला जातो. या दिवशी बकरे कापून समाजातील सर्व लोकांना बोलावून मटणाचे जेवण दिले जाते.

**हळद :-**

हळदीसाठी ब्राह्मणांकडून पाच सुवासिनीची नावे काढली जातात. नवरा नवरी दोघांना एकत्र मांडवात बसवून हळद लावली जाते. सर्व प्रथम नवरदेवाला हळद लावतात. नंतर नवरीला हळद लावली जाते. हळद कार्यक्रमानंतर मोकळ्या जागेत पाट अंथरून त्याच्याभोवती चार कोपऱ्यावर तांबे ठेवून त्याला दोरा गुंडाळतात आणि त्या चौकोनात प्रथम नवरदेवाला स्त्रियांच्या हाताने अंघोळ घातली जाते. त्यानंतर अशाच पद्धतीने नवरीला अंघोळ घातली जाते. हळदीसाठी नवरी हिरवी साडी परिधान करते. नवरी कडील मंडळी नवऱ्याचा पोशाख घेतात. नवऱ्या कडील मंडळी नवरीचा पोशाख घेतात. नवऱ्या मुलाकडून नवरीच्या मामीला, आजीला, आत्याला साडी चोळी दिली जाते. तसेच नवरीकडून नवऱ्याच्या आईला साडी चोळी दिली जाते. लग्नाचा सर्व खर्च पूर्वी मुलीकडून केला जात असे परंतु कालंतराने त्यात बदल झालेला दिसून येतो. मुलीला लग्नात रुकवत दिला जातो. यामध्ये तिच्या संसारासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचा समावेश असतो. उदा,भांडी, कपडे, सजावटीचे साहित्य इ. नवरा-नवरीला हळद लागल्यानंतर करवल्या सोबत त्यांना केळवणासाठी नातेवाईक, गावातील लोक, समाज बांधव यांच्याकडून आमंत्रित केले जाते. विवाह हे गोरज मुहुर्तावर होतात. हळद लागल्यानंतर नवरदेवाला नवीन कपडे घालून मारुतीच्या दर्शनाला नेले जाते. मारुतीचे दर्शन झाल्यानंतर नवरदेवाला मांडवात आणले जाते. मुलीची आत्या मांडवात वराची ओवाळणी करते. विवाहात वधु व वर या दोघांच्या मामाची उपस्थिती आवश्यक असते. वधूचा मामा वधूला घेऊन मांडवात येतो. त्यावेळी वराच्या मागेसुद्धा मामा असणे आवश्यक असते. हा विधी करताना दोन्ही कडच्या मामाच्या हातात लिंबु लावलेले चाकू असतात. वराच्या हातात देखील लिंबु लावलेले चाकू असतो. वधु व वरामध्ये अंतरपाट असतो. अंतरपाट धरल्यानंतर गोरज मुहुर्तावर मंगलाष्टके म्हटल्या जातात.

| | | |
|---|---|---|
| | | मंगलाष्टके चालू असताना सर्व आमंत्रित लोक वधु- वरावर अन्नधान्याच्या अक्षदा टाकतात. मंगलाष्टके झाल्यानंतर वधु-वर एकमेकांना पुष्पमाला अर्पण करतात. यानंतर विवाह संपन्न होतो .<br>**सप्तपदी** :<br>यामध्ये नवरदेवाच्या व नवरीच्या अंगावर उपरणे असते. या दोन्ही उपरन्यांची गाठ बांधून होमाभोवती सात फेरे घेतले जातात व अशा रीतीने सप्तपदीचा कार्यक्रम होतो.<br>**कन्यादान विधी :**<br>वधुचे मामा, मामी वधु-वराचे पाय धुतात. या सर्व विधीनंतर विवाह संपन्न होतो. या नंतर पाठराखीण समवेत वधुची पाठवणी केली जाते. लग्नानंतर सत्यनारायणची पूजा असते. ही पूजा सर्व हिंदू खाटिक लोक करतात. उच्च खाटिक लोक हे वधुचा गृहप्रवेश करण्यासाठी पंडित / ब्राह्मण बोलवितात.<br>(ब) हिंदु पध्दतीप्रमाणे विवाह होतात. विवाह ब्राहमणाकडुन लावला जातो. सर्व विधी हिंदु पध्दतीप्रमाणे असतात. या समाजात हुंडा पध्दती नाही, ऐच्छीकरित्या वधुच्या पालकांकडून नव-या मुलाला वस्तु , दागिने या स्वरुपात भेटि दिल्या जातात. |
| १० | राहणीमान | (अ) यांचे राहणीमान हे मराठी लोकांप्रमाणेच असते. धोतर, कुर्ता हा पुरुषांचा पोशाख तर नऊवारी साडी हा महिलांचा पोशाख होता. कालांतराने पोशाखात बदल झालेला दिसून येतो. मराठ्यांप्रमाणे हे लोक दागिने परिधान करतात.<br><br>**शारीरिक वैशिष्ट्ये**:-<br>मागासवर्गीय जातीतील लोकांच्या तुलनेत या जातीतील लोक हे उंच, शक्तिशाली, अधिक कार्यक्षम व चपळ असतात.<br>**पुरुष** - धोतर, कुर्ता<br>**स्त्रिया** - नऊवारी साडी<br>**सध्याचा पोषाख :**<br>**पुरुष** : तरुण पुरुष पँट शर्ट, तर वृध्द धोतर, सदरा परिधान करतात.<br>**स्त्रिया** : स्त्रिया सहावारी साडी, मुली सलवार खमीस तर वृध्द स्त्रिया |

| | | |
|---|---|---|
| | | नऊवारी साडी नेसतात. |
| ११ | **मृत्युविधी** | (अ) **मृत्यु विधी :**<br>काही खाटिक लोक हे मृत शरीराचे दफन करतात. बहुतेक खाटिक लोक हे मृत शरीराचे ज्वलन करतात. घोलप व नखाते कुळातील काही लोक हे मृत देहाचे दफन करतात.<br>**लारोकर कुळ** :<br>मृत देहाचे ज्वलन करतात. पतीच्या आधी पत्नीचे निधन झाल्यास तिचा चेहरा झाकला जात नाही. या विरुद्ध विधवा स्त्री असेल तर पांढऱ्या वस्त्राने संपूर्ण शरीर झाकले जाते. मृत्यु विधीनंतर मुलगा स्मशान भूमीत स्नान करतो. दुसऱ्या दिवशी अस्थींचे विसर्जन नदीत केले जाते. मुलाचे केश वपन केले जाते. तिसऱ्या दिवशी सर्व नातेवाईकांना जेवणासाठी आमंत्रित केले जाते.<br>(ब) मृत व्यक्तिचे ज्वलन करतात. दुसऱ्या दिवशी सावडतात, ३-या दिवशी अस्थिचे नदीमध्ये विसर्जन करतात, १३ दिवस सुतक पाळतात, १३ व्या दिवशी सर्व नातेवाईकांना बोलावून गोडाचे जेवन करतात. या विधीस आलेली पाहुणे मंडळी वर्गणी काढून सुतक असणाऱ्या कुटूंबीयांचा कडूघास काढतात. (जेवण देतात ) तर वर्षानंतर श्राध्य करतात. |
| १२ | **आडनावे** | (अ) आदमाने, फिसके, साबणे, कांबळे, काटे, डोंगरे, घोणे, घोटणे, घोलप, जठार, गायकवाड, बेंद्रे, पेंढारे, इ.<br>(ब) रत्नपारखे, थोरात, आर्य, सुर्यलाद, गोतरकर, सौदागे, मुराळकर, आदमाने, गायकवाड, कांबळे, जमदाडे, भोपळे, रावळकर, लासुरे, वंजारे, डोंगरे, खडके, गालिंदे, काथवटे, खराटे, सदानंदे, चेवले, घोणे, लासुरे, माणकर, रुमणे, जाधव, साबणे, पवार, घोडके, ताठे, प्रभाळे, कोथमिरे, घोलप, धाकपाडे, हिवराळे, कल्याणकर, घोटणे, पेंढारी, माकोडे, पलंगे,इंगवले, गालिंदे, जठार, ताडे, साबणे, भताडे, जवारे, |
| १३ | **आहार** | (अ) या लोकांचे मुख्य अन्न ; ज्वारीची भाकरी , भाजीपाला , कडधान्ये , मासे बकरी , मेंढीचे मांस इ.<br>(ब) शाकाहार, मांसाहार करतात. मोठ्या प्राण्यांचे मांस खात नाही उदा: गाय, बैल, ............. |

| | | |
|---|---|---|
| १४ | **कला/कोशल्ये** | (अ) भिंतीवर दुर्गा देवीची चित्रे काढली जातात .<br>(ब) प्रत्यक्ष चर्चेतुन मिळालेल्या माहितीनुसार या समाजाची अशी कोणतीही कला नव्हती. या समाजातील लोकांची कोणतीही कला/ कौशल्ये पुर्वी सुध्दा नव्हती मात्र या समाजातील लोकांमध्ये व्यवहारचातुर्य असते. |
| १५ | **श्रध्दा / अंधश्रध्दा** | **देव/ देवता :**<br>हिंदू धर्मातील सर्व देव –देवतांची पुजा –अर्चा करतात . दुर्गामाता , पार्वती , गणेश , हनुमान , शिवशंकर , साई , कबीर, अंबागडे , कारोजी बुवा हे मुख्य दैवत मानले जाते. देवीला बोकड , कोंबडीचा बळी देवून तिची आराधना केली जाते .<br>**कुलदैवत :**<br>जेजुरीचा खंडोबा, तुळजापुरची भवानी माता, भैरवनाथ इत्यादी. कुलदेवतेच्या पूजेवेळी सर्व खाटिक लोक एकत्र येतात. खंडोबा, भवानी माता प्रत्येकाचे कुलदैवत वेगवेगळे असते.<br>(ब) हे लोक सर्व हिंदु देवतांची पूजा करतात उदा: शंकर, गणपती, अंबाबाई, भैरोबा, दत्त, ............... |
| १६ | **जात पंचायत** | (अ) या समाजाची जात पंचायत असते. या जात पंचायतीचे सभासद हे वयोवृद्ध व्यक्ती असतात. गुजरात मधील जात पंचायत हि 'बारा पंच' म्हणून ओळखली जाते. विवाह, घटस्फोट, हिंसा अशा संबधित असलेले सर्व प्रकारचे वादविवाद या पंचायतीत सोडविले जातात. जात पंचायतीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास पंचायत अशा व्यक्तींवर बहिष्कार टाकते. जात पंचायतीमध्ये ५ सभासद असतात. या सभासदांना 'सेठ' म्हणतात.तर जो मुख्य असतो. त्याला 'मुखिया' म्हणतात. सेठ ची निवड ही त्याच्या गुणवत्तेनुसार होते. तर मुखीयाची निवड ही 'सेठ' कडून केली जाते . या जात पंचायतीचे प्रादेशिक सभासद असतात. हे सभासद त्या - त्या प्रदेशातून निवडले जातात. या जात पंचायतीमध्ये संपत्ती वाटपातील वाद, स्त्रियांची भांडणे, घटस्फोट, यांसारखे वाद मिटविले जातात. तसेच या पंचायतीला शिक्षा करण्याचा अधिकार ही असतो. सध्या ही जात पंचायत पध्दत बंद झालेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | (ब) पूर्वी या समाजात कुटुंब पंचायत होती या पंचायतीमध्ये कुटुंबातील वाद – विवाद सोडविले जात म्हणुनच तिला "कुटुंब पंचायत" असे म्हंटले जात. पंचायतीतील पंचाची निवड हि समाजातील लोकांकडुन पुर्ण संमतीने केली जाते. कालांतराने हि पंचायत नामशेष झाली. |
| १७ | **पारंपरिक व्यवसाय** | **व्यवसाय :**<br>या समाजाचा मुख्य पारंपरिक व्यवसाय छोट्या प्राण्यांची कत्तल करुन त्याची मांस विक्री हा आहे. हे लोक फक्त शेळी, मेंढी, बकरी या छोटया प्राण्यांची मांस विक्री करतात. |
| १८ | **सध्याचा व्यवसाय** | (ब) बदलत्या काळानुसार व शिक्षणानुसार यांच्या व्यवसायात देखील बदल झालेला दिसुन येतो सध्या हे लोक विविध क्षेत्रात कार्यरत असलेले दिसुन येतात. उदा: डॉक्टर, अभियंता, शिक्षक, प्राध्यापक, सरकारी नोकरी, वकिल..................<br>या समाजाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जरी हे लोक विविध व्यवसाय करीत असले तरी बहुतांश कुटूंबामध्ये त्यांचा पारंपरिक व्यवसाय चालू ठेवतात. |

❖ **अभिप्राय :**

१. घटना (अनुसूचित जाती) आदेश १९५० नुसार अनुसूचित जातीची यादी १० ऑगस्ट १९५० मध्ये जाहीर करण्यात आली त्यावेळेस सी. पी. अ‍ॅण्ड बेरार प्रोव्हिन्स मध्ये विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये खाटिक या जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीमध्ये होता. तसेच ही बाब महाराष्ट्राची पुर्नरचना १ मे १९६० रोजी झाल्यानंतर देखील फक्त विदर्भातील जिल्हयांमध्ये खाटिक या जातीचा उल्लेख अनुसूचित जातीच्या यादीमध्ये करण्यात आलेला आहे. १३ ऑक्टोबर १९६७ मध्ये जाहीर झालेल्या इतर मागास वर्गीयांच्या यादीत विदर्भ वगळता इतर जिल्हयांमध्ये खाटिक या जातीचा समावेश करण्यात आला.

२. केंद्रशासनाने क्षेत्रिय बंधन उठविल्यानंतर ९ डिसेंबर १९७७ च्या शासन निर्णयानुसार खाटिक या जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीत करण्यात आला.

३. शासनाच्या दिनांक २६ सप्टेंबर २००९ च्या पत्रासोबत सुधारित यादीत इतर मागास वर्गीयांच्या यादीमध्ये अनु. क्र. २५७ वर **कसाई, कसाब, कुरेशी** या जातींचा समावेश आहे, याच यादीमध्ये अनु. क्र. ३१६

वर **खाटिक, कुरेशी खाटिक, कसाई** या जातींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे अनुसूचित जातीच्या यादीतील अनु. क्रमांक ३१ वर असलेली **"खाटिक"** जात व इतर मागास वर्गीयांच्या यादीत अनु. क्रमांक ३१६ वर खाटिक जातीचा समावेश झालेला असल्यामुळे, जातीचा दाखला देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना व जात पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना जातीचे दाखले देताना अडचणी निर्माण होत आहेत.

तसेच इ. मा. व. च्या यादीतील २५७ वर दर्शविण्यात आलेले **कुरेशी व कसाई** तसेच अनु. क्रमांक ३१६ वर दर्शविण्यात आलेले **कुरेशी खाटिक व कसाई** या जातींबाबत देखील अधिक स्पष्टता शासन स्तरावरुन देण्यात यावी. कारण एकाच जातीचा उल्लेख दोन ठिकाणी आलेला आहे.

४. खाटिक समाजाचा व्यवसाय हा मेंढया, शेळी व बकरी यांची कत्तल करुन त्यांचे मांस विकणे हा आहे व हा व्यवसाय अस्वच्छ असल्यामुळे त्या जातीला अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

५. खाटिक जातीच्या लोकांना शेळी, मेंढया व बकऱ्यांची खरेदी करण्याकरीता धनगर समाजाच्या लोकांशी संपर्क साधावा लागतो व बऱ्याचदा त्यांना त्यांच्या सेवेचा लाभ सुध्दा घ्यावा लागतो. काही खाटिक समाजाच्या लोकांनी त्यांच्या मुळ व्यवसाया बरोबरच नशिले पदार्थ व मद्य विक्रीचा जोड धंदा सुध्दा करीत असे. त्यामुळे त्यांच्या दाखल्यांमध्ये खाटिक या जातीच्या उल्लेखासोबतच काही ठिकाणी कलाल, लाड, मराठा खाटिक, धनगर खाटिक अशा नोंदी घेण्यात येत असल्याचे खाटिक समाजाच्या घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये, उपस्थित खाटिक बांधवांनी, नमुद केले आहे. व त्यामुळे जातीचा दाखला घेताना व जात पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र घेण्यासाठी प्रचंड त्रास होतो. अनेक वेळेस त्यांना जातीचा दाखला व वैधता प्रामणपत्र मिळत नाहीत, असे त्यांनी कार्यशाळेत नमुद केले.

तथापि, खाटिक जातीचे प्रकरण पडताळणी समितीकडे प्राप्त झाल्यानंतर त्या प्रकरणावर समितीकडून गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्यात येतो. खाटिक अथवा इतर कोणत्याही जातीच्या प्रकरणांची पडताळणी करताना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या कु. माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाडयामध्ये प्रत्येक प्रकरणे हे स्वतंत्र ग्राहय धरुन त्याची पडताळणी करण्यात येते. अर्जदार यांनी अर्जासोबत दाखल केलेले वाडवडिल यांच्या जन्म मृत्यूच्या नोंदी, शाळेत दाखल केलेल्या नोंदी, महसुली पुरावे व प्रकरणासंदर्भात अर्जदारांच्या रक्त नातेसंबंधातील अन्य कोणत्याही व्यक्तीच्या जातीचे पुरावे इ. कागदपत्रांची शहा निशा करुन अशा प्रकरणामध्ये समितीमार्फत कायदा व नियमांच्या आधारे निर्णय घेऊन अर्जदाराचा जातीचा दावा खरा आढळल्यास अर्जदार यांना अशा प्रकरणी वैधता

३३

पृ-९३

प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे प्रत्येक प्रकरण हे समितीकडे स्वतंत्रपणे छाननी व तपासणी होत असल्याने समित्याकडून प्रकरणामध्ये लाभार्थ्यांची अडवणूक होण्याची शक्यता नाही.

६. खाटिक समाजाच्या दस्ताऐवजांमध्ये बऱ्याच ठिकाणी मराठा खाटिक, धनगर खाटिक, कलाल खाटिक, क्षत्रिय मराठा खाटिक, लाड खाटिक, सुर्यवंशी लाड खाटिक अशा नोंदी आढळतात त्यामुळे मराठा, लाड, सुर्यवंशी लाड, धनगर, कलाल इत्यादि जातींचा उल्लेख असलेल्या व खाटिकाचा व्यवसाय करणाऱ्या लोकांना अनुसूचित जातीचे लाभ मिळत नसल्यामुळे अशा लोकांना जातीचा लाभ मिळण्याबाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत, लाड, कलाल या जातींचा समावेश इतर मागास वर्गीयांच्या व धनगर या जातीचा समावेश भटक्या जमातीच्या यादीत करण्यात आलेला आहे. या तिन्ही जातींचे राहणीमान, चालीरिती, वेशभुषा व व्यवसाय या एकमेकांपासून भिन्न आहे. त्याचप्रमाणे हिंदु खाटिक व लाड, कलाल, धनगर या जातीतील लोकांमध्ये कोणत्याही प्रकारचे साम्य दिसून येत नाही. त्यामुळे लाड, कलाल, धनगर या जातीचे लोक नामसदृशतेचा वापर करुन खाटिक या जातीचे लाभ / फायदा घेण्याची दाट शक्यता आहे.

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे.**

# संदर्भसूची

१) People of India , Maharashtra, Volume -2 , Kumar Suresh Singh,B.R.Bhatnagar,Edition-2004.

२) The Tribes And Castes Of The North-Wester's India , Vol III , W. Crooke.

३) People Of India Maharashtra , Volume- IIII, Part –I, K.S. Singh.

६) The Tribes And Castes Of The Central Proviences Of India , R.V. Russel, Rai Bahadur Hira Lal.

७) महाराष्ट्रातील निवडक जाती – जमाती, डॉ . देवगावकर.

८) Tribes and castes of the central provinces of India, R.V.Russell and Hiralal, p.no-४८०

९) Gazetteer of solapur १९८४, p.no-१४.

१०) Nomadic Tribes &Social work in India, Dr.B.S. Ghatage.

११) Tribes and castes of central provinces of India, Russell and Hiralal , volume – ii.

१२) Nomadic Tribes &Social work in India, Dr. B. S. Ghatage.

१३) भारतीय संस्कृतिकोश.

१४) Hindu Khatik Sanghtna , Pune.

१५) http://en.wikipedia.org/wiki/khateek

१६) **http://en.wikipedia.org/wiki/Qassab**

१७) **http://en.wikipedia.org/wiki/Qureshi.**

१८) http://en.wikipedia.org/wiki/Dhangar.

१९) http://www.dalitmuslims.com/2009/06/appeal-to-recommend-for-scrapping.html.

२०) आराध, मुक्तेश्वर.